**<u>ठळक बातम्या</u>**

- परदेशी विद्यापीठांची संकुलं असलेली एज्युसिटी नवी मुंबईत उभी राहणार, ५ परदेशी विद्यापीठांसोबत राज्य सरकारचा करार

- शेतकरी कर्जमाफीसाठी समिती स्थापन करण्याचं आश्वासन सरकारनं दिल्यानंतर बच्चू कडू यांचं आंदोलन मागे, समितीशिवाय कर्जमाफी करण्याची काँग्रेसची मागणी

- नीट युजी २०२५ चा निकाल जाहीर/ राज्यातला कृशांग जोशी देशात तिसरा

- अहमदाबादमधल्या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारकडून उच्चस्तरीय समितीची घोषणा, एअर इंडिया मृतांच्या कुटुंबांना आणखी २५ लाख रुपये मदत देणार

**आणि**

- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वीज पडून चार जण ठार तर दोनजण जखमी

**<><><><><>**

विविध परदेशी विद्यापीठांची संकुलं असलेली एक पूर्ण नवी एज्युसिटी नवी मुंबईत विमानतळाजवळ उभारली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत दिलं. इंग्लंडमधली युनिव्हर्सिटी ऑफ ॲबरडीन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतलं इलिनॉय टेक आणि इटलीचं आयईडी स्कूल ऑफ डिझाइन यांना आज नवी मुंबईत शैक्षणिक संकुल सुरू करण्यासाठीची इरादापत्रं देण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. याचं परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी,स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारणारण्यात येणार आहे. येथे आगामी कालावधीत दहा विद्यापीठ एकत्र येतील, अशी संकल्पना राबवण्याचा विचार आहे, असं ते म्हणाले.

संपूर्ण जग आज भारताकडे फक्त एक जागा म्हणून नाही, तर ज्ञान आणि माहितीच्या क्षेत्रातला भागीदार म्हणून बघत आहे, असं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यावेळी म्हणाले. विद्यार्थ्यांना आपल्या देशातच जागतिक दर्जाचं शिक्षण परवडण्याजोग्या शुल्कात मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. विकसित भारताच्या प्रवासात हा एक महत्त्वाचा टप्पा असून शिक्षणामुळेच देशाचं भविष्य सुरक्षित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी आज दुपारी उपोषण स्थगित केलं. शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी आठवडाभरापासून ते आंदोलन करत होते. कर्जमाफीसाठी १५ दिवसात उच्च स्तरीय समिती स्थापन करुन समितीच्या अहवालानुसार कर्जमाफीच्या संदर्भात सरकार निर्णय घेईल असं आश्वासन सरकारनं त्यांना दिलं आहे. दिव्यांगांच्या मानधन वाढीसाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करु असंही सरकारनं त्यांना दिलेल्या पत्रात म्हटलं आहे. पीक कर्जाची सक्तवसुली थांबवणं आणि कर्जफेड न केलेल्या शेतकऱ्यांना नव्यानं कर्ज देण्याची मागणी ८ दिवसात पूर्ण करण्याची अट बच्चू कडू यांनी यावेळी ठेवली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी समितीची वाट न पाहता तत्काळ कर्जमाफी करण्याची मागणी काँग्रेसनं केली आहे. निवडणुकीच्या वेळी कर्जमाफीचं आश्वासन देताना समितीची अट ठेवली नव्हती मग आता कशाला ही अट पुढे करता, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

आज सरकारकडे लाखो कोटी रुपयांचे महामार्ग आणि विविध प्रकल्प उभारण्यासाठी पैसे आहेत, परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मात्र सरकारी तिजोरी रिकामी असल्याचा देखावा केला जात आहे, असं काँग्रेस नेते बाळासाहेब

थोरात म्हणाले. युपीए आणि महाविकास आघाडी सरकारनं कर्जमाफी दिली होती याची आठवण माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी करुन दिली.

<><><><><>

वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षा नीट २०२५ चा निकाल जाहीर झाला असून त्यात महाराष्ट्राच्या कृशांग जोशीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. राजस्थानच्या महेश जोशीने प्रथम क्रमांक तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा क्रमांक मिळवला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या ntaneet.nic.in या संकेतस्थळावर तपशीलवार निकाल उपलब्ध आहे. देशभरातल्या ५५२ आणि देशाबाहेरच्या १४ शहरांमध्ये ४ मे रोजी आयोजित केलेल्या या परीक्षेला २२ लाखांहून अधिक उमेदवार बसले होते.

<><><><><>

नीट युजी २०२५ परीक्षेतल्या विद्यार्थ्यांची पैशांच्या बदल्यात चांगल्या गुणांचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या दोघांना मुंबईतल्या सीबीआयच्या विशेष न्यायालयानं सोमवारपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

यातला एक आरोपी सोलापूरचा आणि दुसरा नवी मुंबईचा आहे. यातल्या एकाला सोमवारी आणि दुसऱ्याला मंगळवारी अटक झाली होती. हे दोघे नवी मुंबई आणि पुण्यात महाविद्यालय प्रवेशाच्या संदर्भात मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांचे चालक आहेत. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या अधिकाऱ्यांशी ओळख असल्याचे भासवून त्यांनी एकेका विद्यार्थ्याकडून ९० लाख रुपयांची मागणी केली होती. हवाला मार्गाने हे पैसे घेतल्याचे पुरावे सापडले आहेत.

<><><><><>

क्रिकेटची पंढरी अर्थात इंग्लंडमधल्या लॉर्ड्स स्टेडिअमवर आज दक्षिण आफ्रिकेचा कसोटी क्रिकेट कर्णधार टेम्बा बावुमा यानं आयसीसी जागतिक कसोटी अजिंकपदाचा करंडक उंचावला आणि २७ वर्षांचा आयसीसी स्पर्धा न जिंकण्याचा

दुष्काळ संपुष्टात आणला. गोलंदाजांनी वर्चस्व गाजवलेल्या या सामन्यात आपल्या झुंझार शतकी खेळीनं दक्षिण आफ्रिकेला आयसीसीचं जेतेपद मिळवून देणारा एडन मार्करम सामनावीर ठरला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- होल्ड - व्हाइस कास्ट --**

*यंदाचा जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झाला. नाणेफेक जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. आणि आफ्रिकेच्या गोलंदाजांनीही ढगाळ वातावरणाचा लाभ घेत हा निर्णय सार्थ ठरवला. कगिसो रबाडानं एकहाती ऑस्ट्रेलियाचा निम्मा संघ तंबूत धाडला आणि पहिल्याच दिवशी, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या २१२ धावात रोखला. स्टिव्ह स्मीथ आणि वेबस्टरच्या अर्धशतकी खेळीनं ऑस्ट्रेलियाला काही प्रमाणत तारलं. गोलंदाजांच्या या चांगल्या कामगिरीनंतरही दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी ऑस्ट्रेलियावर वर्चस्व गाजवण्याची संधी गमावली आणि सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सच्या घातक गोलंदाजीसमोर दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव केवळ १३८ धावांतच गडगडला. स्वभाविकपणे पुन्हा एकदा विजेतेपदाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा संघ कच खाणार अशीच परिस्थिती निर्माण झाली होती.*

*मात्र दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी पुन्हा एकदा चमकदार कामगिरी केली, दुसऱ्या डावात रबाडानं ४ तर लुंगी एन्गिडीनं ३ गडी बाद करत ऑस्ट्रेलियाला २०७ धावांमध्येच रोखलं. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं ७४ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला दुसऱ्या डावात विजयासाठी २८२ धावांचं लक्ष्य मिळालं. आता विजयी लक्ष्य गाठण्याची जबाबदारी होती ती फलंदाजांची. दुसऱ्या डावात विजयी लक्ष्याचा पाठलाग आफ्रिकेचा सलामीवीर रिकल्टन अवघ्या सहा धावा करून माघारी परतला. मात्र त्यानंतर एडन मार्करम यानं आधी मल्डर याच्यासोबत अर्धशतकी, तर त्यानंतर कर्णधार बावुमा सोबत शतकी भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या समीप पोहचवलं.... सामन्याच्या चौथ्या दिवशी मार्करम झुंझार १३६ धावा करून बाद झाला तर बावुमानं ६६ धावांची महत्वाची खेळी केली. अखेर मिशेल स्टार्क च्या गोलंदारीवर वेरेन यानं एक धाव घेत दक्षिण आफ्रिकेच्या अजिंक्यपदावर मोहोर उमटवली....*

**<><><><><>**

अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातानंतर देशात कार्यरत असलेल्या ३४ बोईंग ७८७ विमानांची नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून सखोल परिक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत आठ विमानांची तपासणी झाल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या दुर्घटनेच्या सखोल चौकशीसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापना केली असून त्यात केंद्र आणि गुजरात राज्य सरकारमधील अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. या समितीला तीन महिन्यांत सर्वंकष अहवाल देण्याच्या सूचना दिल्याचंही नायडू यांनी सांगितलं.

या विमान अपघातातल्या मृत प्रवाशांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपये तातडीची मदत द्यायचा निर्णय एअर इंडियानं घेतला आहे. टाटा समूहानं आधीच एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आज अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडला. जिल्ह्यात दोन ठिकाणी वीज पडण्याच्या घटना घडल्या. यामध्ये चार जण ठार तर दोनजण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एका महिलेचा आणि दोघा भावांचा समावेश आहे.  वीज पडून झालेल्या दुर्घटनेत चार जनावरे देखील दगावलीत.

**<><><><><>**

मुंबईच्या गोवंडी भागात आज संध्याकाळी एका डंपरनं चौघांना चिरडलं. यात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगेकूच उत्तर-मध्य महाराष्ट्रापासून गुजरात मार्गे वायव्येकडे होत आहे. हवामान विभागानं आज रत्नागिरी आणि रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना रेड अलर्ट, तर मुंबई शहर आणि मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, सातारा, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**